Vol. 1, Issue . 1 / March 2011, pp.61-64

Research Paper - Economics

# 'सेझ' शेतकऱ्यांच्या मुळावर

प्रा. गणेश विठ्ठलसिंह चव्हाण
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, ता. बिलोली, जि. नांदेड

आज जगातील प्रत्येक राष्ट्र आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी शक्य ते प्रयत्न करीत आहे. जी राष्ट्र अविकसित, अल्पविकसित अथवा विकसनशील आहेत त्यांना तर विकास साध्य करणे आवश्यकच आहे परंतु जी राष्ट्रे पूर्वीपासूनच विकसीत आहेत. त्यांना सुध्दा आणखी वृध्दी साध्य करावयाची आहे. हा आर्थिक विकास कोणत्या पध्दतीने घडवून आणावा याबाबत अर्थतंज्ञामध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. रोजेस्टीन रोडान, रॅग्रर नर्क्स व ऑर्थर लुईस सारखे अर्थतज्ञ संतुलीत विकासाचा मार्ग सुचवितात. ज्यात अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्राचा सारख्या प्रमाणात विकास घडून येण्यासाठी अविकसीत क्षेत्रात गुंतवणूक करुन त्या क्षेत्राचा विकास घडवून आणला जातो. तर रोस्टोव्ह , हर्षमन सारखे अर्थतज्ञ मात्र असंतुलीत विकासाचा मार्ग सुचवितात. ज्यात अर्थव्यवस्थेतील काही प्रमुख क्षेत्राची निवड करावी व त्या क्षेत्रात गुंतवणूक वाढवून त्या क्षेत्राचा विकास घडवून आणला तर त्याच्या प्रसारक परिणामातून इतर क्षेत्राचा सुध्दा विकास घडून येईल.

आज बऱ्याच राष्ट्रांनी असंतुलीत विकासाच्या मार्गाचा अवलंब केल्याचे दिसून येते. याचीच प्रचिती म्हणजे निर्यात प्रक्रिया क्षेत्र व विशेष आर्थिक क्षेत्र होय. विविध राष्ट्रांनी निरनिराळया पध्दतीने या संकल्पनेचा स्विकार केला असला तरी उद्येश मात्र 'आर्थिक विकास' हाच आहे.

विशेष आर्थिक क्षेत्राची संकल्पना सर्वप्रथम स्पेनने सन 1929 मध्ये स्विकारली त्यानंतर 1951 मध्ये आयर्लंडने निर्यात क्षेत्राची स्थापना करण्यास सुरुवात केली पण याचा प्रसार व विस्तार ख–या अर्थाने 1960 नंतर झाला, तो जागतिक बॅकेच्या मान्यतेनंतर. चीनने सन 1979 पासून विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्यास सुरुवात केली. भारताला मात्र याची चाहूल बऱ्याच उशिरा लागली. भारत सरकारने सन 2000 मध्ये देशात विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याची घोषणा केली. परंतु यापूर्वी भारतात अशी संकल्पना अस्तित्वातच नव्हती असे नाही. भारतात सन 1965 मध्येच निर्यात प्रक्रिया क्षेत्राची स्थापना करण्यात आली होती. पण यास अपेक्षित यश दिसून येत नव्हते.

भारताचे तात्कालीन वाणिज्य श्री. मुरासोली मारन सन 2000 मध्ये चीनच्या दौऱ्यावर असताना तेथील विशेष आर्थिक क्षेत्राच्या प्रगतीने प्रभावित होऊन ती संकल्पना भारतात स्विकारण्या संबंधीचा प्रस्ताव मांडला. राष्टीय लोकशाही आघाडी सरकारने सन 2000 साली विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण करण्याचे धोरण प्रथमतः स्विकारले. विशेष आर्थिक क्षेत्राची अंमलबजावणी, व्यवस्था, कायदा व कार्यपध्दती निश्चीत करण्यासाठी 'विशेष आर्थिक क्षेत्र कायदा ' सन 2005 मध्ये मंजूर करण्यात आला आणि सन 2000 पासून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली.

आश्चर्याची बाब म्हणजे डाव्या विचारसरणीच्या पक्षांनी सुध्दा या धोरणास पाठींबा दिला. प्रत्यक्ष या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर या धोरणातील त्रुटी आणि समस्या दिसून येऊ लागल्या म्हणून आज हेगेलच्या द्वंद्ववादाप्रमाणे विशेष आर्थिक क्षेत्राचा पुरस्कार करणारा एक वर्ग तर त्यास विरोध करणारा दुसरा वर्ग निर्माण झाला आहे. अशा आर्थिक विकासातील कळीच्या मुद्दयावर चर्चा व्हावी म्हणून हा खटाटोप. कारण वाद–प्रतिवादी यातूनच शेवटी सुसंवाद घडून येऊ शकतो. अर्थात त्यावरील यथायोग्य चर्चेवरूनच त्या घटकाची योग्य समिक्षा होऊ शकते.

भारत सरकारने सन 1990–91 च्या काळात परकीय चलना संबंधी बरेच वाईट अनुभव घेतले. तेव्हापासून परकीय चलन मिळविण्याबाबत सरकार विविध

योजना राबवित आहे. विशेष आर्थिक क्षेत्र स्थापनेमागे सुद्धा निर्यात वृद्धी द्वारे परकीय चलन मिळविणे हे प्रमुख उद्दिष्टय आहे. त्याचबरोबर भारतात भांडवलाचा अभाव आहे. त्यास पर्याय म्हणून विदेशी भांडवल देशात आकर्षित करण्याचा उद्देश देखील ठेवण्यात आला. देशात रोजगारात मोठया प्रमाणात वाढ व्हावी व देशातील पायाभूत सुविधांचा विकास व्हावा. निर्यात वृध्दीतील प्रशासकीय अडसर दूर व्हावेत आणि कामगार विषयक कायद्यामुळे उत्पादनवाढीला जो अडथळा निर्माण होतो तो दूर करण्यासाठी तसेच देशाची जागतिक पातळीवर स्पर्धाशक्ती वाढावी अशा अनेक दृष्टीकोनातून भारतात विशेष आर्थिक क्षेत्राची संकल्पना स्विकारण्यात आली.

'' विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे असा प्रदेश की जो शुल्करहीत असेल तसेच आयात–निर्यातीच्या दृष्टीने त्यास परकीय क्षेत्र मानला जाईल.''

''विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे मुद्दाम निश्चित केलेला असा कररहीत क्षेत्र की जो व्यापारी व्यवहारासाठी आणि शुल्क व करांसाठी परकीय मुलूख समजण्यात येईल.''

विशेष आर्थिक क्षेत्रात देशातील कायदे लागू पडणार नाहीत. निर्यात वृध्दीच्या दृष्टीने या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या उत्पादनावर व उत्पन्नावर करामध्ये सूट देण्यात आली आहे. विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करणा–या विकासकास अनेक सवलती देण्यात आल्या आहेत. या क्षेत्रात आयात होणा–या वस्तुंवर आयात शुल्क नसेल तसेच निर्यात वस्तूवर कस्टम डयुटी नसेल. देशांतर्गत उत्पादकांकडून विशेष आर्थिक क्षेत्रात आणलेल्या वस्तू व सेवांवर उत्पादन शुल्क नसेल, सेवा कर केंद्रीय विक्रीकराबरोबरच उत्पन्न करात प्रथम 10 वर्ष 100 टक्के सुट तर विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये 100 टक्के परकीय गुंतवणूकीस मान्यता असेल. महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्रांना पाणी पुरवठयाची तसेच अखंडीतपणे वीज पुरवठा करण्याची हमी राज्य शासनाने घेतली आहे. विशेष आर्थिक क्षेत्रांना स्वयंशासित स्वायत्त संस्था म्हणून औद्योगिक शहरांचा दर्जा देण्यात येईल.

भारतात ज्या विशेष आर्थिक क्षेत्रांना मान्यता देण्यात येत आहे त्यांचे विभाजन आकारावरून तीन विभागात करता येते. बहुउत्पादन क्षेत्र ज्यात एकाच क्षेत्रात अनेक प्रकारच्या वस्तू उत्पादित केल्या जाऊ शकतात व त्यासाठी किमान 1000 हेक्टर भु–क्षेत्र असणे आवश्यक आहे. दुसरा प्रकार असेल सेवा पुरविणारे क्षेत्र, ज्यात मानवी संसाधन सेवा, तंत्रज्ञानात्मक सेवा, शैक्षणिक सेवा, आरोग्य विषयक सेवा अशा अनेक प्रकारच्या सेवांची निर्मीती करण्यात येईल. यांचे किमान भू–क्षेत्र 100 हेक्टर असेल आणि तिसरा प्रकार असेल इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, जैवतंत्रज्ञान अपारंपारिक उर्जा व ज्वेलरी उत्पादनासाठी असणारा क्षेत्र त्याची किमान भू–क्षेत्र मर्यादा आहे 10 हेक्टर.

विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करणारा विकासक आणि तिथे प्रत्यक्ष उत्पादन करणारे उत्पादक यात भेद असेल, विकासक उत्पादकांना जमीन व इतर सुविधा प्राप्त करुन देईल तर उत्पादक आपले भांडवल व यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने प्रत्यक्ष उत्पादन करतील. या क्षेत्रात 25 टक्के जमीनी प्रत्यक्ष उत्पादनासाठी वापरली जाईल (सध्या 50 टक्के प्रस्तावित आहे) तर 75 टक्के जमीन ही इतर सेवा पुरविण्यासाठी वापरली जाईल. ज्यात घरे, मनोरजंन केंद्र, हॉस्पिटल, मॉल, शाळा महाविद्यालये अशी सेवा केंद्रे उभारले जातील.

विशेष आर्थिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारी जमीन संपादन करुन देण्याची जबाबदारी सुरुवातीस तेथील राज्य सरकारने घेतली. परंतू जमीन संपादनात ब–याच राज्य सरकारांना जनतेचा रोष पत्कारावा लागल्याने नंतर ही जबाबदारी विकासकाकडेच सोपविण्यात आली. सर्वात अधिक प्रमाणात विशेष आर्थिक क्षेत्रांना विरोध होतो तो जमीन संपादनाबाबतच भारताच्या वाटेला एकूण 29, 73, 190 चौ.कि.मी जमीन आलेली आहे. यातील 15, 34, 166 चौ.कि.मी जमीनीचा अर्थात एकूण जमीनी पैकी 51.6 टक्के जमीनीचा वापर कृषी उत्पादनासाठी करण्यात येतो. सन 2007 पर्यंत मंजूर झालेल्या 396 (अंतिम + तत्वतः) विशेष आर्थिक क्षेत्रासाठी 1750 चौ.कि.मी जमीन म्हणजेच एकूण भू.क्षेत्रापैकी 0.05 टक्के किंवा एकूण शेतजमीनीपैकी केवळ 0.11 टक्के

जमीन आवश्यक आहे असा युक्तीवाद सरकार दरबारी करण्यात येतो. पण 1750 चौ.कि.मी जमीन किती व्यक्तींच्या ताब्यात असेल. यावर उपजीवीका चालवणारे किती कुटूंबे आहेत? पुढे यांच्यासाठी काय उपाय योजना असणार? याचा विचार करण्यात आलेला नाही.

सुरुवातीच्या कालावधीत राज्य सरकारांनीच जमीन संपादन करुन विकासकांना देण्याचा प्रयत्न केला. यात पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, आध्रंप्रदेश, हरियाणा, पंजाब, ओरिसा, महाराष्ट्र या राज्यात मोठया प्रमाणात शेतक–यांचा विरोध झाला. हा विरोध दडपण्यासाठी सरकारने ब्रिटीश दडपशाही पध्दतीचा वापर केला. यातूनच जालियनवाला बाग हत्याकांडाची आठवण करुन देणारी घटना पश्चिम बंगालमधील नंदीग्रामजवळ घडली. 14 मार्च 2007 रोजी सरकारच्या दलाली स्वरुपाला विरोध करणा–या निरपराध व निशस्त्र शेतकऱ्यांवर गोळीबार करण्यात आली त्यात 14 लोक मृत्युमुखी पडले तर 150 लोक जखमी झााले. या घटने विरुध्द प्रतिक्रिया देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा उमटल्या. त्यामुळे सरकारने माघार घेतली. अशाच लहान–मोठया घटना इतर राज्यात सुध्दा घडल्या. त्यामुळे सरकारने जमीन संपादनातून हळूच अंग काढून घेतले आणि ही जबाबदारी विकासकावर सोपविण्यात आली.

अशा प्रकारचा प्रखर विरोध शासनास का झाला असेल? सरकारने आर्थिक विकासासाठी तर जमीन संपादन केली होती. अशा योजनांमध्ये एकतर शेतक–यांना विश्वासात घेण्यात आले नाही आणि दुसरी बाब म्हणजे येथील जनतेचा सरकारच्या योजनावर तीळमात्र विश्वास नाही. हेच अशा घटनावरुन सिध्द होते. सरकार कमी किमतीने जमीनी शेतक–यांकडून सक्तीने खरेदी करुन विकासकांन चढया किंमतीने विकण्यासाठी देत आहे हिच भावना जनतेत आजही दिसून येते.

आता जमीन संपादनाची जबाबदारी विकासकावर सोपविण्यात आली. त्यामुळे याबाबतचा गुंता आणखीनच वाढणार. विकासक जमीन संपादनासाठी साम, दाम, दंड व भेद अशा सर्वच साधनांचा वापर करणार. अशा आर्थिक दृष्टया सक्षम विकासकांपुढे शेतक–यांचा निभाव लागणार का? त्याचबरोबर विकासक व शेतकरी यांच्यात जमीनीच्या किंमती कशा पध्दतीने ठरणार याबाबत कोणतीच तरतूद करण्यात आली नाही. विकासकाला एखाद्या क्षेत्रात विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याची कल्पना जरी सुचली तरी तेथील जमीनीच्या किंमती आकाशाला भिडलेल्या असतील. आणि तेथील सर्वच शेतकरी जमीन विकण्यास का तयार होतील?काही शेतक–यांना गरज सुध्दा नसेल. त्यांना शेती व्यवसायातील उत्पन्न पुरेसे वाटत असेल तर त्यांनी आपली जमीन का विकावी? समजा शेतकऱ्यांच्या उपजिवीकेचे साधन काढून घेऊन त्यांना आजन्म उत्पन्न मिळेल याची शाश्वती काय?भारतात निरक्षर व अज्ञानी शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्याचबरोबर भारतीय संस्कृतीचा विचार करता भारतात जमीनीला मातेसमान मानले जाते. कोणताही शेतकरी आपल्या काळया आईला सहजासहजी विकावयास तयार होणार नाही.

जमीन संपादनामुळे त्या शेतजमीनीवर जो मजूर वर्ग काम करुन आपला उदरनिर्वाह चालवत होता. यांना कोणत्या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होणार आहे? यांच्या विषयी सरकारजवळ कोणती योजना आहे? असे अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात. भारतातील ज्या भागातील शेतक–यांनी आपल्या जमीनी विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विकल्या तेथील शेतक–यांचे व शेतमजुरांचे स्थलांतर शहरी भागात होईल. पुन्हा शहरी भागात धारावी सारख्या झोपडपट्टया वाढू लागतील. अर्थात ग्रामीण भागातील समस्या शहरी भागात स्थलांतरीत होऊन केंद्रीकृत होऊ लागतील.

भारतीय शेतीक्षेत्र व औद्योगिक क्षेत्र यांत दृढ स्वरुपाचा आंतरसंबंध दिसून येतो. म्हणजे औद्योगिक क्षेत्रास कच्चामाल उपलब्ध करुन देण्याचे व बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे कार्य शेतीक्षेत्र करते तर शेतीक्षेत्रास आदाने व बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे कार्य औद्योगिक क्षेत्र करते. अशा स्थितीत शेतजमीनीचा वापर मोठया प्रमाणात विशेष आर्थिक क्षेत्र स्थापण्यासाठी करण्यात आला तर शेती उत्पादनावर अवलंबून असणारे उद्योग बंद पडतील. उत्पादनात घट होईल आणि देशात मोठया प्रमाणात बेरोजगारीची लाट निर्माण होईल. या

सर्वांना रोजगार कसे पुरवणार?यात बहुसंख्य व्यक्ती निरक्षर, अकुशल असणार यांना विशेष आर्थिक क्षेत्रात सुध्दा काम मिळणार नाही. कारण विशेष आर्थिक क्षेत्रातील उत्पादन उच्च तंत्रज्ञानावर आधारीत असेल येथे उच्च तंत्रज्ञान आत्मसात केलेल्या व्यक्तींनाच रोजगार प्राप्त होईल.

विशेष आर्थिक क्षेत्रासाठी कोणत्या जमीनीचा वापर करण्यात यावा या संबंधी सुध्दा सरकारकडे योग्य धोरणाचा अभाव दिसून येतो. कॉंग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा श्रीमती सोनिया गांधी यांनी स्पष्ट केले आहे की, कृषी उत्पादनासाठी अयोग्य असणा–या जमीनीचा वापर विशेष आर्थिक क्षेत्रासाठी केला जाईल. पण एकाच ठिकाणी अधिक प्रमाणात पडिक जमीन मिळेल का? तसेच प्रशासकीय अधिका–यांशी संगणमत करुन विकासक कृषी योग्य भूमिचा वापर अकृष भूमि म्हणून करणार नाहीत याची शाश्वती काय? जर कृषी उत्पादन घेणा–या जमीनी विशेष आर्थिक क्षेत्र स्थापनेसाठी वापरण्यात आली तर भारताच्या अन्न सुरक्षिततेबाबत प्रश्न चिन्ह निर्माण होऊ शकतो. आजही आपणास मोठया प्रमाणात आयात करावी लागते.

भारतात औद्योगिक विकास झाला पाहिजे याबाबत दुमत नाही कारण आर्थिक विकास साध्य करण्यासाठी औद्योगिक विकास होणे आवश्यक असते पण शेती क्षेत्रावर व शेतक–यांवर अन्याय करुन विकास साध्य करणे कितपत योग्य ठरेल? याचा विचार झाला पाहिजे. भारतीय शेतकरी पुर्वीपासूनच कर्जाच्या दुष्टच्रकात अडकलेला. यातूनच भारतात शेतक–यांच्या आत्महत्येचे प्रमाण सतत वाढत आहेत. अशा स्थितीत शेतक–यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवणे गरजेचे असताना सरकार विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधी धोरण अधिक प्रभावीपणे राबवत आहे हे शेतक–यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे नव्हे का?

परकीय चलन मिळविण्यासाठी एवढी उठाठेव असेल तर आयात पर्यायीकरणाचा मार्ग प्रभावी ठरणार नाही का?आयात केल्या जाणा–या वस्तू व सेवांचे पर्याय शोधून त्यांच्या उत्पादनावर भर दिल्यास परकीय चलनाची फारशी आवश्यकता असणार नाही. भारत हा शेतक–यांचा देश म्हणून ओळखला जातो. जोपर्यंत शेतक–यांचा विकास होणार नाही तोपर्यंत भारताचा ख–या अर्थाने विकास घडून येणार नाही. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी 'कृषी निर्यात क्षेत्र' स्थापन करता येतील का? याबाबत विचार होणे गरजेचे वाटते. यातून परकीय चलन सुध्दा उपलब्ध होऊ शकेल व शेतक–यांचा आर्थिक विकास सुध्दा साध्य होऊ शकेल. काही मुठभर विकासकांना त्याचा लाभ होण्याऐवजी बहुसंख्य शेतक–यांना जर लाभ मिळत असेल तर ते निश्चितच फायदेशीर असेल. अल्पकालीन व अल्पसमुहाच्या विकासापेक्षा दिर्घकालीन व बहुसंख्य लोकांचा विकास होणे हे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हितावह ठरेल.

संदर्भ सूची :–

1) एस.के. मिश्र आणि व्ही.के.पुरी 'भारतीय अर्थव्यवस्था', हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई 2007.
2) डॉ. आर.एन.सोनी : 'कृषी अर्थशास्त्र के मुख विषय ' विशाल पब्लिशिंग कंपनी, जालंधर, 2006.
3) डॉ.एम.एल.झिंगन : 'विकास का अर्थशास्त्र एवं आयोजन ', वृंदा पब्लिकेशन, दिल्ली, 2006.
4) डॉ. विनायक गोविलकर : 'विशेष आर्थिक क्षेत्र ', डायमंड पब्लिकेशन, पुणे 2007
5) डॉ. मधुसूदन साठे : 'भारताच्या आर्थिक समस्या', डायमंड पब्लिकेशन, पुणे 2008.
6) भारतीय अर्थव्यवस्था, 'प्रतियोगिता दर्पण', आग्रा, 2009.
7) कुरुक्षेत्र मासिक, जानेवारी 2007.